सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)


संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/३११ दिनांक : २३/०९/२०२६.

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक/ मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,

विषय : १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे औचित्य साधून शैक्षणिक वर्ष २०२६–२७ करिता विशेष बाब म्हणून साहित्य विषयक उपक्रम तसेच किल्ले संवर्धन आणि वारसा अभ्यास या विषयावर उपक्रम राबविणेबाबत प्रस्ताव ऑनलाईन पाठविण्याबाबत.

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन माहे जानेवारी, २०२७ मध्ये आयोजित केले जाणार आहे. १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे महाराष्ट्राच्या समृद्ध साहित्यिक व वैचारिक परंपरेतील ऐतिहासिक पर्व आहे. या ऐतिहासिक प्रसंगाचे औचित्य साधून राज्यातील युवक व विद्यार्थ्यांचा संमेलनातील अधिकाधिक आणि सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे, तसेच त्यांच्यामध्ये वाचन, लेखन, चिंतन व सर्जनशील अभिव्यक्तीची जाणीव दृढ करणे आवश्यक आहे. १०० व्या साहित्य संमेलनाचे हे ऐतिहासिक वर्ष केवळ साहित्याचा उत्सव न राहता विद्यार्थ्यांच्या विचार, वाचन आणि सर्जनशीलतेला दिशा देणाऱ्या व्यापक विद्यार्थी साहित्य चळवळीचे प्रारंभवर्ष ठरावे याउद्देशाने राज्य शासनाने विविध सांस्कृतिक कार्यक्रम, उपक्रम राबविण्याबाबत निर्देश केले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठालाही दीर्घ आणि ऐतिहासिक परंपरा आहे. लक्षावधी विद्यार्थी या विद्यापीठातून घडले आहेत. मराठी साहित्य विश्वातील असंख्य सारस्वतांनी विद्यापीठात अध्ययन केले आहे, अध्यपन केले आहे आणि प्रमुख वक्ते या नात्याने पायधूळ झाडलेली आहे. अनेकांच्या साहित्यकृती विद्यापीठातील अभ्यासक्रमाचा भाग आहे.

विद्यापीठ अधिकार मंडळाने याबाबत घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठ म्हणून जी सुवर्णसंधी मिळालेली आहे या निमित्ताने मराठी साहित्याची जाण तरूण पिढीस व्हावी तसेच विद्यार्थ्यांनी प्रवृत्त व्हावे, मराठी साहित्याची निर्मिती व्हावी या दृष्टीने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तिनही जिल्हयांच्या कार्यकक्षेत तदनुषंगिक कार्यक्रम उदा. कथाकथन, काव्यसंमेलन, साहित्य संमेलन यासारखे साहित्य विषयक उपक्रम घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

UNESCO च्या प्रतिष्ठित 'जागतिक वारसा स्थळ' यादीत राज्यातील ऐतिहासिक किल्ल्यांचा समावेश होणे ही महाराष्ट्रासाठी आणि मराठी माणसासाठी तसेच संपूर्ण भारतासाठी अत्यंत अभिमानाची आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण बाब आहे. या अनुषंगाने विद्यापीठाने इतिहास, पुरातत्त्व, स्थापत्यशास्त्र, पर्यावरण, वनस्पती, प्राणि, मृदा, भूगोल, पर्यटन व वारसा व्यवस्थापन, अभियांत्रिकी यासारख्या विविध विषयांमध्ये पुढाकार घेऊन कामकाज करणे आवश्यक आहे. या ऐतिहासिक वारशाचे संवर्धन, शास्त्रीय पद्धतीने दस्तऐवजीकरण आणि भावी पिढ्यांपर्यंत त्याचे जतन करण्यासाठी विद्यापीठाच्या माध्यमातून 'किल्ले संवर्धन आणि वारसा अभ्यास' या विषयावर विशेष शैक्षणिक व संशोधनात्मक उपक्रम राबविण्याची आवश्यकता आहे.

याला अनुसरून **<u>प्रस्तुत पत्राच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०२६–२७ या कालावधीतच विशेष बाब म्हणून राबविण्याकरिता आपणांकडून विहित पद्धतीने पुढील प्रस्ताव आमंत्रित आहेत.</u>**

पुढील उपक्रमाचे ऑनलाईन प्रस्ताव भरताना खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अर्जामध्ये योजनेच्या अनुषंगाने माहितीची PDF फाईल (१ MB पर्यंत) अपलोड करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र. | प्रस्ताव | उपक्रम तपशील | अपलोड करावयाच्या फाईलबाबत माहिती |
|---|---|---|---|
| ०१ | १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे औचित्य साधून साहित्य विषयक उपक्रम | काव्यवाचन, काव्यसंमेलन, नाट्यवाचन, ग्रंथदिडी, कथाकथन, पुस्तक प्रदर्शन, पुस्तक परीक्षण स्पर्धा, पत्रकारिता या विषयावर कार्यशाळा, अभिजात भाषा आधारित उपक्रम, लोक साहित्य, पुस्तक परीक्षण, लोककला व लोकसाहित्य–विद्यार्थी संशोधनपर शोधनिबंध अथवा हस्तलिखित, बोली भाषेतील शब्द–अभ्यास, लोकपरंपरांवर आधारित कार्यक्रम, लेखक आपल्या भेटीला, साहित्य संमेलन, महाविद्यालयाच्या वैशिष्ट्यंनुसार इतर नाविन्यपूर्ण साहित्यविषयक उपक्रम. | प्रस्तावित उपक्रम/कार्यक्रमांचा आराखडा (उद्देश, तज्ञ व्यक्ती, संसाधन व्यक्ती यांची नावे व घेण्यात येणाऱ्या उपक्रम/कार्यक्रमाचे स्वरूप तपशील), आवश्यक तेथे प्रवास तपशील, उपक्रम/कार्यक्रमांचा प्रस्तावित आराखडा/रुपरेषा |
| ०२ | गड, किल्ले संवर्धन आणि वारसा अभ्यास विषयक उपक्रम | गड–किल्ले संवर्धन मोहीम, गड–किल्ल्यांच्या ऐतिहासिक वारशाबाबत जनजागृती अभियान,गड–किल्ले परिसरात ऐतिहासिक वास्तू व अवशेषांचे दस्तऐवजीकरण, गड–किल्ल्यांवर जनजागृती साहित्य निर्मिती, गड–किल्ल्यांवरील ऐतिहासिक वारशावर व्याख्याने व परिसंवाद, छायाचित्रण, चित्रकला, स्थानिक इतिहास व गड–किल्ल्यांशी संबंधित मौखिक इतिहासाचे संकलन, महाविद्यालयाच्या कार्यक्षेत्रातील गड–किल्ल्यांच्या संवर्धनासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम.<br>गड–किल्ल्याचा इतिहास, पुरातत्त्व, स्थापत्यशास्त्र, पर्यावरण, वनस्पती व प्राणी, मृदा, भूगोल, पर्यटन व वारसा व्यवस्थापन, अभियांत्रिकी यासारख्या विविध विषयांवर परीक्षण, निरीक्षण व सर्वेक्षण | |
| | | १. महाविद्यालय/परिसंस्थांना सदर उपक्रमाचे प्रत्येकी एकच (०१) प्रस्ताव सादर करता येईल.<br>२. सदर उपक्रम ही प्राधान्याने एक दिवसीय असावेत.<br>३.महाविद्यालय/परिसंस्थाकडून वरीलप्रमाणे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर विद्यापीठ निर्देशांच्या अधिन राहून कुठल्याही स्तरावर विचाराधीन, अनिर्णित, मान्य, अमान्य अथवा व्यपगत करण्याची/मानण्याची कार्यवाही केली जाऊ शकते.<br>४. सदर उपक्रमांकरिता आवश्यक असलेली विद्यापीठ मान्यता मिळाल्यानंतरच संबंधित उपक्रमांची अंमलबजावणी करावी. | |

**यानंतर ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेल्या उपक्रमांच्या अर्जाची प्रिंट काढून त्यावर मा. प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी घेऊन सदर स्वाक्षरी असलेले अर्ज स्कॅन करून तिथेच अपलोड करणे अनिवार्य आहे. त्यानुसार विद्यार्थी विकास मंडळाकडे ऑनलाईन (Online) पद्धतीने अपलोड करून प्राप्त होणारे प्रस्तावच पुढील प्रक्रियेकरिता विचाराधीन असतील.**

शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये विशेष बाब म्हणून आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेत राबविण्यात येणारी उपक्रमांचे प्रस्ताव विद्यापीठ संकेतस्थळावर ( www. unipune.ac.in –BOD - BOD Online – Login – Main Menu – Online Services – Students Developement– साहित्य संमेलन विशेष प्रस्ताव) येथे ऑनलाईन पद्धतीने भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. प्रस्तुत पत्राच्या अधिन राहून आपण सादर करू इच्छित असलेल्या प्रस्तावाची लिंक **गुरूवार, दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहिल.**

त्यानंतर आपल्या प्रस्तावावर विद्यार्थी विकास मंडळ विभागाकडून पुढील योग्य ती कार्यवाही करून महाविद्यालय/परिसंस्थेच्या वेबमेल (Webmail) वर तसेच विद्यापीठ संकेतस्थळावर पुढीलप्रमाणे **(Students Developement– Menu–Download All Schemes approvals)** येथे ऑनलाईन संमती/मंजूरी पत्र देण्याची व्यवस्था तयार केली आहे.

महाविद्यालय/परिसंस्थाकडून वरीलप्रमाणे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर शासन व विद्यापीठ निर्देशांच्या अधिन राहून कुठल्याही स्तरावर विचाराधीन, अनिर्णित, मान्य, अमान्य अथवा व्यपगत करण्याची/मानण्याची कार्यवाही केली जाऊ शकते.

याला अनुसरून प्रस्तुत पत्रासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आपण संबंधित विभागांना/शिक्षकांना अवश्य सूचित करावे. कळावे, ही विनंती.

**ऑनलाईनबाबत अधिक माहिती व मदतीसाठी : ०२०–७१५३३६३३**

Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in

**विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन अधिक माहितीसाठी : ०२०–२५६२२६८०/८१**

**(प्रा. डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ